# अहवाल

खेड तालुका शिक्षण मंडळाचे, साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयात, विद्यार्थी विकास मंडळातर्फे २ ऑक्टोबर २०१९ रोजी स्वच्छता ही सेवा या कार्यक्रमांतर्गत प्लास्टिक बंदी या विषयी श्रमदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या आजूबाजूच्या सर्व परिसरात असणाऱ्या सर्व प्लास्टिक च्या वस्तू म्हणजेच सर्व प्लास्टिक कचरा गोळा करून एका ठिकाणी साठवून ठेवला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.एस.एम.जगताप, प्रा. वाघमारे मॅडम, प्रा.गायकवाड मॅडम, प्रा.पोखरकर सर , प्रा.उलागडे सर उपस्थित होते, त्याचबरोबर महाविद्यालयातील विद्यार्थीही उपस्थित होते. सर्वच शिक्षक आणि विद्यार्थी सर्वांनी मिळून स्वच्छता ही सेवा या कार्यक्रमांतर्गत प्लास्टिक कचरा गोळा करण्यासाठी श्रमदान केले.

ह्या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या आवारातील सगळे प्लास्टिक कचरा महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ठिकाणी गोळा केला. सर्व प्लास्टिक कचरा गोळा करून त्या कचऱ्याची योग्य ती विल्हेवाट लावण्याचे ठरवले.

## महाविद्यालयातील विद्यार्थी महाविद्यालयाच्या आवारातील प्लास्टिक कचरा गोळा करताना








